डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर संलग्नित

आदर्श एज्युकेशन सोसायटी अंभई संचलित

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कला व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड

ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

## माहिती पुस्तिका



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर संलग्नित

आदर्श एज्युकेशन सोसायटी अंभई संचलित

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम
# कला व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड

ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

स्थापना वर्ष
२०२२

## माहिती पुस्तिका
२०२५-२६

प्राचार्य - प्रा. एम.एस.थोरे

संपर्क
९८६०५५२२९७

E-mail : dr.apjabdulkalamsillod@gmail.com


# आमचे प्रेरणास्थान



## मा. आमदार अब्दुल सत्तार अब्दुल नबी

मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य

# नव्या आशा, नवी किरणे



## मा.श्री अब्दुल समीर अब्दुल सत्तार

अध्यक्ष

आदर्श एज्युकेशन सोसायटी, अंभई

# आमचे मार्गदर्शक



## मा.श्री रईसखान सर

प्रशासकीय अधिकारी
आदर्श एज्युकेशन सोसायटी, अंभई

# प्राचार्य



## प्रा. एम.एस.थोरे

डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम कला व विज्ञान
महाविद्यालय, सिल्लोड

# मनोगत . . . . . . .



आदर्श एज्युकेशन सोसायटी अंभई या संस्थेस उद्देशून दोन शब्द .......
संस्थेअंतर्गत चालणाऱ्या विविध शाखा, विद्या शाखा व कोर्सेस याचा फायदा गोरगरीब विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी मी अहोरात्र प्रयत्नशिल आहे. तालुक्यातच नव्हे जिल्ह्यात वेगवेगळे प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत विविध शाखा चालू आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी आच्या संस्थेमार्फत मी व संपूर्ण कार्यकारी मंडळ सदैव कार्यरत आहोत, माझी शिक्षणाप्रती असलेली तळमळ आणि सिल्लोड तालुक्यातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा विचार करुन असे लक्षात आले की, तालुक्यातील शैक्षणिक परिस्थिती जेम-तेम असून परिसरातील गरीब विद्यार्थी हा शिक्षणापासून वंचीत राहू नये आणि ग्रामीण भागातील गरीब व होतकरु विद्यार्थी जिल्ह्याच्याच नव्हे तर राज्य व देशपातळीवर चमकावा यासाठी मी व आदर्श एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारी मंडळाने अहो-रात्र प्रयत्नशील आहोत.

सिल्लोड भागामध्ये उच्च शिक्षणाची अत्यंत नितांत गरज लक्षात घेता, डॉ.एपीजे अब्दुल कलाम महाविद्यालयाची स्थापना करुन विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षणाची सोय हेच माझे व आमच्या संस्थेच्या मंडळाचे स्वप्न होते आणि ते पूर्ण करण्यात आम्ही यशस्वी ठरलो. सिल्लोड परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची व्यवस्थित सोय नव्हती, ही बाब लक्षात घेता, सिल्लोड परिसरात वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील गरीब व हलाकीच्या परिस्थितीमुळे त्याच बरोबर कोणत्याही स्तरातील विद्यार्थी हा शिक्षीत व्हावा त्यासाठी समाजकारण त्याच बरोबर राजकारण यांच्या माध्यमातून मी विविध जनउपयोगी उपक्रम राबवित आहे. त्यातला शिक्षण हा अत्यंत महत्वाचा उपक्रम व घटक आहे आणि या घटकाला उच्च स्तरावर नेण्यासाठी संस्थमार्फत अत्यंत सोईस्करपणे विविध उपक्रम हे राबविले जात आहेत. आमच्या या संस्थेचे छोटेसे रोपटे आता विशाल वृक्षाचे रुप धारण करीत आहे. याचा फायदा समाजातील प्रत्येक घटकांसाठी व व्यक्तींसाठी त्याच बरोबर समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत चांगल्या प्रकारे पोहचला पाहिजे त्यासाठी मी सदैव प्रयत्नशिल व कटीबध्द आहे.

धन्यवाद ...

**मा.आ.श्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी**
मा. मंत्री महाराष्ट्र राज्य

# प्रस्तावना . . . . . . .



आदर्श एज्युकेशन सोसायटी अंभई या संस्थेच्या विद्यमाने चालणाऱ्या विविध प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय व संस्थमार्फत इतर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याचा दिर्घानुभव आल्यानंतर सिल्लोड शहर व ग्रामीण भागात गरिब व होतकरु विद्यार्थी तसेच या भागातील अल्पसंख्यांक व तळागाळातील विद्यार्थी जे शहरात जाऊन शिक्षण घेऊ शकत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी सिल्लोड क्षेत्रात वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापन जून २०२२ मध्ये आदर्श एज्युकेशन सोसायटीच्या वतीने करण्यात आली. संस्थेचे मार्गदर्शक मा. आमदार श्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी यांची शिक्षणाविषयी असलेली तळमळ व कुशल नेतृत्व यामुळे सिल्लोड या भागातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय करुन देण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्याच बरोबर मा. अध्यक्ष साहेबांची शिक्षणाविषयी असलेली आस्था त्याच बरोबरीने काम करणारे कार्यकारी मंडळ यांचे सातत्यशिल कार्य प्रणाली त्याच बरोबरीने सहकार्य नेहमीच लाभले. आदर्श एज्युकेशन सोसायटी या नावे एका छोट्याशा रोपट्याने सुरुवात करुन, आज छोट्याशा रोपट्याचे एक मोठे वृक्ष झालेले दिसून येत आहे. आज त्याच्या सावलीत अनेक विद्यार्थी शिक्षण घेत असून काही विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून आपले जीवनमान उंचविले व पुढील जीवन सार्थ केले. महाविद्यालयाची गेल्या नऊ वर्षांची लक्षणीय प्रगती पाहता, आज ३०० ते ४०० विद्यार्थी महाविद्यालयात सहभाग, वाङ्मय कार्यक्रमात सहभाग तसेच विद्यापीठीय क्रिडा स्पर्धा व युवक महोत्सवामध्ये सहभाग उल्लेखनिय असून महाविद्यालयांतर्गत वेगवेगळ्या योजना व कार्यक्रमामधून राष्ट्रीय एकात्मता व अखंडता टिकविण्यासाठी महत्वपूर्ण कार्य केले जात आहे. या महाविद्यालयाच्या माध्यमातून पर्यावरण संकलन व वृक्षसंवर्धन असे कार्यक्रम हाती घेतले आहे. सर्व सोयींनी युक्त असलेले तसेच अत्याधुनिक संगणीकृत ग्रंथालय, सुसज्य विज्ञान प्रयोगशाळा, अत्याधुनिक तंत्रज्ञान सह येथे आहे प्रयोगशाळेतील सर्व साहित्य व्यवस्थित आणि सर्व सोयीयुक्त असे बनविले आहे. या महाविद्यालयाचे नाव विद्यार्थ्यांनी विविध क्रिडा नैपुण्य या क्षेत्रात बनविले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रती त्यांच्या कलागुणाला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशिल आहोत. विद्यार्थ्यांसाठी कमवा आणि शिका अशी योजना हाती घेतली आहे. संस्थेच्या अध्यक्ष साहेबांनी रोवलेले हे रोपटे विस्ताराने वाढ आहे. त्याच बरोबर या विषयात येणाऱ्या नवनवीन तंत्रात्मक बदल परिक्षेत विद्यार्थी जास्तीत जास्त यशस्वी व्हावेत या दृष्टीने आमचा सर्वांचा प्रयत्न राहणार आहे. तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विविध कौशल्यातून उपक्रम आम्ही हाती घेतलेले आहेत. त्या दृष्टीने भविष्यात येणाऱ्या नवनविन संधींच्या अनुषंगाने विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, जाणकार, साहित्यिक, वैज्ञानिक यांची व्याख्याने आयोजित केले जाते. परिसरातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, व्यक्तिमत्व विकास कसा साधता येईल ह्या दृष्टीकोनातून मा. अध्यक्ष साहेब, सचिव, कार्यकारी मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुचविलेलल्या सुचनांतून कार्य चालू आहे.

**मा.श्री अब्दुल समीर अब्दुल सत्तार**

अध्यक्ष - आदर्श एज्युकेशन सोसायटी

अंभई

# प्राचार्यांचे मनोगत . . . . .



महाविद्यालयाची सुरुवातीपासून लक्षणीय प्रगती पाहता उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवून विजयरथ चौफेर दौडत आहे. तसेच विद्यालयातील वेगवेगळ्या योजना व कार्यक्रमांमधून राष्ट्रीय एकात्मता व अखंडता टिकविण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.
पर्यावरण संरक्षण व संवर्धन असे कार्यक्रम हाती घेतले आहे. सर्व सोयींनी युक्त असलेले तसेच अत्याधुनिक संगणकीकृत ग्रंथालय येथे आहे प्रयोगशाळेतील सर्व साहित्य व्यवस्थित आणि सर्व सोईयुक्त असे बनविले आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्रिडा नैपूण्य या क्षेत्रात उज्वल बनविले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रती त्यांच्या कलागुणांना वाव व प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशिल आहोत. त्याच बरोबर या विषयात येणाऱ्या नवनविन तंत्रात्मक बदल आणि स्पर्धा परिक्षेत विद्यार्थी आहे. तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या स्पर्धात्मक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विविध कौशल्यातून विविध उपक्रम आम्ही हाती घेतले आहे. या दृष्टीने भविष्यात येणाऱ्या नवनविन संधीच्या अनुषंगाने विविध क्षेत्रातील तज्ञ, जाणकार, साहित्यिक, वैज्ञानिक व्यक्ती यांची व्याख्याने आयोजित केलेले आहेत. परिसरातील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास, व्यक्तिमत्व विकास कसा साधता येईल या दृष्टीकोनातून मा. अध्यक्ष साहेब, सचिव साहेब, कार्यकारी मंडळ, प्राध्यापक व शिक्षकेत्तर यांनी सुचविलेल्या सुचनांतून कार्य यशस्वीपणे चालू आहेत.

प्राचार्य,

**प्रा. एम.एम. थोरे**

(डॉ.एपीजे अब्दुल कलाम कला व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड)

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये -

१) प्रशस्त व आकर्षक अशी महाविद्यालयाची इमारत.

२) सामान्य ज्ञान मासिक चाचणी ट्युटोरियल पध्दती या महाविद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत.

३) बदलत्या शैक्षणिक आव्हानांना सामोरे जाण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

४) विज्ञाननिष्ट दृष्टिकोनातून सभोवतालच्या परिसराशी समायोजन करण्याची क्षमता निर्माण करण्याचे सातत्याने प्रयत्न.

५) विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदु असून विद्यार्थी हा केवळ नावापूरत विद्यार्थी न राहता त्याला समाजार्थी बनवण्याचा अविरत प्रयत्न.

६) महाविद्यालयात पी.एच.डी./एम.फिल./नेट-सेट अशी शैक्षणिक अर्हता धारक उच्च विद्याविभुषीत प्राध्यापक वृंद आहेत. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा फायदा विद्यार्थ्यांना सदैव होत आहे.

७) महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अशा आधुनिक व्यायाम शाळा व क्रिडा साहित्य, क्रिडा मैदान इ. सुविधा मोफत देण्यात येतात.

८) महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे ग्रंथालय असून त्यात सर्व विषयांचे संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत.

९) सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा.

## प्रवेशासंबंधीचे नियम व अटी -

१) महाविद्यालयाच्या विविध विद्या शाखेतील वर्गात विद्यापीठ नियमानुसार प्रवेश दिले जातील.

२) सर्व वर्गांचे प्रवेश तात्पुरते असतील.

३) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतांना आवश्यक ती कागदपत्रे व दस्तऐवज सादर करुन विहीत शुल्क भरुन प्रवेश घ्यावा, खोट्या व अपुऱ्या कागदपत्रांद्वारे घेतलेला प्रवेश केव्हाही रद्द करण्यात येईल.

४) विद्यापीठाच्या वेळोवेळी बदलणाऱ्या नियमानुसार व निकषानुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील.

५) विद्यार्थ्यांनी माहिती पुस्तिका सोबत दिलेला अर्ज आणि मजकुर काळजीपूर्वक वाचुन विद्यापीठाच्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरुन त्याची प्रत महाविद्यालयात जमा करावी.

६) विद्यार्थ्याने विद्याशाखा व ऐच्छिक विषय याची निवड निश्चितपणे व काळजीपूर्वक करावी. निवडलेली विद्याशाखा व ऐच्छिक विषय कोणत्याही परिस्थितीत नंतर बदलता येणार नाही.

७) प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या मुळप्रती व दोन सत्यप्रती जोडाव्यात.

अ) शाळा / कॉलेज सोडण्याचे प्रमाणपत्र (टि.सी.) व त्यांच्या दोन प्रती.

ब) १२ वी चे मुळ गुणपत्रिका व त्यांच्या दोन सत्यप्रती

क) जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate) असल्यास.

ड) विद्यापीठाच्या कक्षेत नसलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतांना (Migration Certificate) सोबत जोडावे.

इ) १० वी व १२ वी चे गुणपत्रकाची सत्यप्रत सोबत जोडावी.

८) प्रवेश अर्जातील अपूरी माहिती, प्रवेश अर्जासोबतचे दस्ताऐवज व त्यातील उणिवा याबाबत विद्यार्थी / पालक जबाबदार राहतील.

९) विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय सर्व प्रवेश तात्पुरते समजण्यात येतील.

१०) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नियमितपणे वर्गात उपस्थित राहणे आवश्यक आहे. ७५ टक्के पेक्षा कमी हजेरी असणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमानुसार शिष्यवृत्ती व इतर सवलती देता येणार नाहीत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना वार्षिक परिक्षेस बसता येणार नाही.

११) महाविद्यालय परिसरातत वावरतांना विद्यार्थ्यांजवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

१२) आधार कार्डाची सत्यप्रत.

**फीस संबंधीचे नियम -** प्रवेश घेते वेळी महाविद्यालयाने ठरविलेली फीस भरुनच प्रवेश मिळेल विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर प्रथम / द्वितीय सत्रात टी.सी. काढल्यास दोन्ही सत्राची फीस पूर्ण भरावी लागेल.

## प्रवेशासंबंधीचे नियमावली -

१) सर्व प्रवेश ऑनलाईन असतील.
२) पदवी स्तरावरील सर्व प्रवेश गुणवत्तेच्या आधारे देण्यात येतील.
३) विहीत मुदतीत आपली नावे नोंदवलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेशास पात्र ठरतील.
४) प्रवेश पुढील प्रमाणे दिले जातील.
  अ) ८५ टक्के जागा गुणवत्तेनुसार.
  ब) ५ टक्के क्रिडा व सांस्कृतिक विशेष नैपुण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांसाठी असतील.
  क) ५ टक्के जागा प्राचार्यांच्या अधिकारातील.
  ड) ५ टक्के जागा संस्थाचालकाच्या अधिकारातील.

टिप - **विद्यार्थ्यांचे प्रवेश हे महाविद्यालय तसेच विद्यापीठ अंतर्गत असलेल्या नियम व अटी नुसारच देण्यात येईल.**

## शिष्यवृत्ती व फी माफीची सवलत -

१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी, भारत सरकारची शिष्यवृत्ती योजना.
२) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना.
३) अपंग व विकलांग विद्यार्थ्यांसाठी, विशेष शिष्यवृत्ती योजना.
४) आदिवासी, दुर्गम, डोंगरी भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना.
५) विशेष नैपूण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांसाठी अध्यक्षीय शिष्यवृत्ती योजना.

टिप - **शिष्यवृत्ती व फी माफीची सवलत मिळविण्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता ही अनिवार्य राहील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

## शिष्यवृत्ती फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्रे -

१) १० वी व १२ वी उत्तीर्ण असल्याची शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र (टी.सी.) सत्यप्रत.
२) १० वी व १२ वी उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रकाची सत्यप्रत (३ प्रतीत).
३) चालु वर्षातील तहसिल कार्यालयाचा पालकांचा उत्पन्नाचा दाखला.
४) जातीच्या दाखल्याची सत्यप्रत.
५) इतर मागासवर्गीयांसाठी (ओ.बी.सी.) नॉन क्रिमीलेयर दाखला झेरॉक्स एक प्रत.
६) मागील शिष्यवृत्ती आदेश क्रमांक व जिल्ह्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा बदलीचे प्रमाणपत्र.
७) यापूर्वी शिष्यवृत्ती घेतलेली नसल्यास मागील शाळेचे शिष्यवृत्ती न घेतल्या बाबतचे प्रमाणपत्र
८) शिक्षणात खंड असेल त शैक्षणिक खंड प्रमाणपत्र (गॅप सर्टीफिकेट).
९) शिष्यवृत्ती मिळत असतांना खंड पडलेला असल्यास शिष्यवृत्ती खंड प्रतिज्ञापत्र.
१०) पासपोर्ट साईज फोटो - तीन (नुकतेच काढलेले).
११) आधार कार्ड झेरॉक्स.
१२) राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले पास बुक झेरॉक्स प्रत.

## अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी सोबत जोडावयाची कागदपत्रे

१) अल्पसंख्यांक असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

२) आधारकार्ड ची सत्यप्रत (झेरॉक्स).

३) राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले पास बुक झेरॉक्स.

४) पासपोर्ट साईज फोटो - तीन (नुकतेच काढलेले).

## अपंग व विकलांग विद्यार्थ्यांसाठी सोबत जोडावयाची कागदपत्रे -

१) अपंग व विकलांग असल्याचे प्रमाणपत्र.

२) आधारकार्ड ची सत्यप्रत (झेरॉक्स).

३) राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले पासबुक झेरॉक्स.

४) पासपोर्ट साईज फोटो - तीन (नुकतेच काढलेले).

## भारत सरकार शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरण्याची पध्दत -

१) एस.सी., एन.टी., एस.टी., ओ.बी.सी., अपंग अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ठराविक नमुन्यातील अर्जाची माहिती जून महिन्यात प्रवेशावेळी उपलब्ध करुन दिली जाईल.

२) विद्यार्थ्यांनी योग्य ती खबरदारी घेवूनच ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज काळजीपूर्वक भरला पाहिजे.

३) अपूर्ण किंवा चुकीची माहिती दिलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

४) योग्यरित्या ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत नमुद केलेल्या आवश्यक कागदपत्रांसहीत महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

५) वरील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने या प्रक्रियेमध्ये महाविद्यालयीन प्रशासन जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

## अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्याची पध्दत -

१) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी अल्पसंख्यांक भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे.

२) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज अंतिम तारखेच्या आत भरुन आवश्यक कागदपत्रांसहीत महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

३) अपूर्ण किंवा चुकीची माहिती दिलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

४) वरील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांची बँक खात्यात जमा होत असल्याने या प्रक्रियेमध्ये महाविद्यालयीन प्रशासन जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

## अपंग व विकलांग विद्यार्थ्यांसाठी, विशेष शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्याची पध्दत -

१) सदरील शिष्यवृत्ती योजना आवेदन पत्र हे समाजकल्याण विभाग कार्यालयातून प्राप्त करुन, नमुद केलेल्या कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

२) वरील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने या प्रक्रियेमध्ये महाविद्यालयीन प्रशासन जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

## महाविद्यालयात उपलब्ध असलेले अभ्यासक्रम

### कला शाखा -

बी.ए. (सत्र पध्दती)
प्रवेश क्षमता - १२० +
माध्यम - मराठी
कालावधी - ३ वर्षे
आवश्यक विषय - इंग्रजी
द्वितीय भाषा - मराठी / हिंदी / उर्दू
खालील दिलेल्या ऐच्छिक विषयाच्या गटांपैकी कोणतेही तीन्ही गटातून प्रत्येकी एक ऐच्छिक विषयाची निवड करावी.

ऐच्छिक विषय -

गट - १) मराठी / हिंदी / इंग्रजी / उर्दू   २) राज्यशास्त्र / समाजशास्त्र
३) इतिहास   ४) अर्थशास्त्र

टिप - १) वरील ऐच्छिक विषयामधून तृतीय वर्षामध्ये कोणताही एक मुख्य विषय निवडता येईल व आवश्यक विषय (इंग्रजी) आणि द्वितीय भाषा (मराठी/हिंदी/उर्दू) अभ्यासक्रमात राहणार नाही.
२) युजीसी व विद्यापीठाच्या आदेशानुसार प्रथम वर्षामध्ये संगणकशास्त्र या विषयाचा पेपर व द्वितीय वर्षामध्ये पर्यावरणशास्त्राचा पेपर देणे अनिवार्य राहतील.

### विज्ञान शाखा -

बी.एस्सी (सत्र पध्दती)
प्रवेश क्षमता - १२० +
माध्यम - इंग्रजी
कालावधी - ३ वर्षे
आवश्यक विषय - इंग्रजी
द्वितीय भाषा - मराठी / हिंदी / उर्दू

ऐच्छिक विषय -

१) रसायन शास्त्र   २) वनस्पतीशास्त्र   ३) प्राणीशास्त्र
४) भौतिकशास्त्र   ५) गणित   ६) संगणक शास्त्र

टिप - १) वरील विषयामधून तृतीय वर्षामध्ये आवश्यक विषय (इंग्रजी) आणि द्वितीय भाषा (मराठी/उर्दू/हिंदी) अभ्यासक्रमात राहणार नाही.
२) युजीसी व विद्यापीठाच्या आदेशानुसार प्रथम वर्षामध्ये संगणकशास्त्र या विषयाचा पेपर व द्वितीय वर्षामध्ये पर्यावरणशास्त्राचा पेपर देणे अनिवार्य राहतील.

# महाविद्यालयात प्राध्यापकांची विभाग निहाय माहिती

प्राचार्य
**प्रा. एम.एस.थोरे**
एम.ए.

✻

मराठी विभाग प्रमुख
**प्रा. अनुराधा भंडारे**
एम.ए., पी.एच.डी.

✻

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
**डॉ. आदमाने सर**
एम.ए., नेट

✻

केमिस्ट्री विभाग प्रमुख
**प्रा. राजेश्वरी अहिरे**
एम.एस्सी.

✻

संगणक शास्त्र विभाग
**प्रा.डॉ. शाह**
एम.एस्सी.

## महिला तक्रार निवारण समिती

| पद | नांव |
|---|---|
| अध्यक्षा | प्रा. एम.एस. थोरे |
| सदस्या | प्रा. राजेश्वर नरेंद्र अहिरे |
| सदस्य | डॉ. उमाळे सर |
| सदस्य | प्रा. शाह शाहरुख |

## विशाखा समिती

| पद | नांव |
|---|---|
| अध्यक्षा | प्रा. मृणालिनी सोपान थोरे |
| सदस्या | प्रा. राजेश्वरी नरेंद्र अहिरे |
| सदस्य | डॉ. शाह शाहरुख |
| सदस्य | प्रा. अनुराधा भंडारे |
| सदस्य | प्रा. नरेंद्र अहिरे |
| मतदनीस | प्रा. जितेन्द्र आबळे |

## पर्यावरण मंडळ

| पद | नांव |
|---|---|
| अध्यक्ष | प्रा. राजेश्वरी नरेंद्र अहिरे |
| सदस्य | डॉ. शाह शाहरुख |
| सदस्य | प्रा. अनुराधा भंडारे |

## रॅगिंग समिती

| पद | नांव |
|---|---|
| अध्यक्ष | प्रा. नरेंद्र अहिरे |
| सदस्या | प्रा. राजेश्वरी नरेंद्र अहिरे |
| सदस्य | डॉ. शाह शाहरुख |
| सदस्य | प्रा. अनुराधा भंडारे |
| सदस्य | प्रा. मृणालिनी सोपान थोरे |

## परिक्षा मंडळ

| पद | नांव |
|---|---|
| अध्यक्ष | प्रा. अनुराधा भंडारे |
| सदस्य | प्रा. नरेंद्र अहिरे |
| सदस्य | प्रा. राजेश्वरी नरेंद्र अहिरे |
| सदस्या | डॉ. शाह शाहरुख |

## विद्यार्थी भविष्य निर्वाहासाठी उपक्रम

१) कमवा व शिका योजना.
२) नॅशनल व्यावसायिक मागदर्शन केंद्र.
३) मागासवर्गीय व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी आंतरमहाविद्यालयीन विशेष करियर मार्गदर्शन

## विद्यार्थ्यांसाठी शिक्षण संक्रमण

१) विभागीय ग्रंथालय सुविधा
२) ई-बुक्स व ई-जर्नल्स
३) सेमिनार व वर्कशॉप
४) पुस्तक पेढी
५) प्रकल्प कार्य
६) शैक्षणिक सहल - ऐतिहासीक व भौगोलिक क्षेत्रास भेटी

## विद्यार्थी कल्याण योजना

१) गरिब व होतकरु विद्यार्थ्यांना मदत
२) पुस्तक पेढी
३) बस पास
४) शिक्षण संक्रमण योजना

## सांस्कृतिक उपक्रम

१) युवक महोत्सव
२) आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा
३) वार्षीक स्नेह संमेलन
४) महाराष्ट्र शासन सांस्कृतिक स्पर्धा
५) दिन विशेष कार्यक्रम
६) डॉ. बाबासहेब आंबेडकर जयंती उत्सव

## वैज्ञानिक उत्सव

१) विज्ञान दिवस व पर्यावरण जनजागृती उत्सव
२) पर्यावरण संक्रमण व संवर्धन
३) अभ्यांगत व्याख्याने
४) भित्ती पत्रक प्रकाशन
५) विज्ञान फोरम

## विज्ञान आरोग्य

१) आरोग्य शिबीर
२) योगासन शिबीर
३) आरोग्य व्याख्यानमाला
४) क्रीडा व व्यायाम शाळा

## महिला सशक्तीकरण

१) रॅगिंग विरोधी कमिटी
२) महिला तक्रार निवारण समिती
३) सुचना पेटी
४) महिला आत्मसंरक्षण मार्गदर्शन

## विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास केंद्र

१) एन. एस. एस.
२) नैसर्गिक मंडळ
३) विज्ञान मंडळ
४) संगीत मंडळ
५) वाङ्मय

## शिस्तपालन

१) ओळखपत्र अनिवार्य
२) महाविद्यालय परिसरात भ्रमणध्वनी व इतर आक्षेपार्ह साहित्य निषेध
३) शिस्तपालन समितीचे गठन
४) विद्यार्थी गणवेश अनिवार्य
५) महाविद्यालय परिसरात धुम्रपान, तंबाखु व गुटखा सेवनास प्रतिबंध
६) महाविद्यालय प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थींनी सोबत गैरवर्तन केल्यास कायदेशीर कार्यवाही
७) महाविद्यालय व महाविद्यालयीन परिसर हे सी.सी.टी.व्ही. कॅमेराच्या निगराणीत

## महाविद्यालयीन भौतिकीय सुविधा

१) प्रकाशमय व अद्यावत वर्ग खोल्या
२) मुख्य स्वतंत्र ग्रंथालय सुविधा
३) प्रदुषण मुक्त महाविद्यालयीन परिसर
४) सेमिनार हॉल व सभागृहाची व्यवस्था
५) स्वतंत्र स्वच्छता गृह व प्रसाधन गृहाची सोय
६) वाहन तळ सुविधा
७) सुसज्य संगणकीकृत कार्यालय
८) आऊट डोअर - इन डोअर खेळाची सुविधा
९) महिला व विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र कक्ष
१०) महाविद्यालयात शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
११) महाविद्यालयात ४० केव्ही जनरेटर व इन्व्हर्टर सुविधा
१२) महाविद्यालयात सर्वांसाठी उपहारगृहाची व्यवस्था

## सर्व साधारण सुचना -

१) महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्यांच्या परवानगी शिवाय जाहिरात, नोटीस व कोणत्याही प्रकारचे तपशील लावू नये.

२) महाविद्यालय परिसर स्वच्छता ही सर्वांची जबाबदारी असून परिसर स्वच्छ राखण्यास हातभार लावावा.

३) महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारच्या बैठका व कार्यक्रम घेण्यास सक्त मनाई आहे.

४) वर्ग तासिक चालू असतांना विद्यार्थ्यांनी व्हऱ्यांड्यात व इंीर परिसरामध्ये फिरु नये.

५) कोणत्याही प्रकारच्या राजकीय व राजकीय संघटनात्मक कार्यस महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सक्त मनाई आहे.

६) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय कोणत्या प्रकारचे सहलीचे आयोजन करु नये.

७) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सन साजरा करण्यासाठी जसे (१५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन, २६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन, १ मे - महाराष्ट्र दिन) महाविद्यालयात हजर राहणे अनिवार्य आहे.

८) महाविद्यालयातील साधन सामग्री वापरत असतांना उदा. पुस्तक, विज्ञान प्रयोगशाळेतील साहित्य, महाविद्यालयातील लाईट, पंखे, खेळाचे साहित्य, संगणक इ. योग्य रितीने हाताळावेत. अन्यथा योग्य ती कार्यवाही करुन दंड आकारण्यात येईल.

९) महाविद्यालयातील परिसरात कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन चालणार नाही.

## फीस विषयक सुचना

१) विद्यापीठ व महाविद्यालयाने ठरविलेल्या प्रवेश व इतर फीस देणे बंधनकारक राहील.

२) विना अनुदानित अभ्यासक्रमांसाठी पूर्ण फीस देणे बंधनकारक राहील.

३) प्रवेश फीस व्यतिरिक्त परिक्षा फीस ही अभ्यासक्रमानुसार आकारण्यात येईल.

४) शिष्यवृत्ती योजना व या सारख्या इतर योजनांचा संबंध प्रवेश व परिक्षा फीस शी संबंधीत राहणार नाही.

## पालकांसाठी सुचना

१) पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेश, वर्ग उपस्थिती, फीस व इतर बाबी या काळजीपूर्वक समजून घ्याव्यात.

२) महाविद्यालयामध्ये वेळो-वेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात उदा. - पालक मेळावा व इतर, उपस्थित रहावे.

३) पालकांनी आपल्या पाल्याच्या उपस्थिती व प्रगती चा आढावा घेण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य व संबंधीत शिक्षकांशी वेळो-वेळी संपर्क ठेवावा.

## महाराष्ट्र शासनाचे विद्यार्थी संदर्भात महत्वपूर्ण नियम

१) महाराष्ट्र रॅगिंग विरोधी नियम १९९९ च्या नुसार महाविद्यालयाच्या परिसरामध्ये होणारा नाही, जर झाल्यास दोषींवर कार्यवाही करुन ५ वर्ष सक्त मजुरी व दंड आकारण्यात येईल.

२) भ्रमणध्वनी व यासारख्या साहित्य महाविद्यालयातील परिसरामध्ये वापर करत असतांना महाविद्यालयाचे नियमांचे पालन करावे.

३) आर.टी.आय. नियम २००५ नुसार परिच्छेद ४ व ५ मध्ये, नियुक्त केलेला कर्मचाऱ्यांकडून महाविद्यालयाची माहिती देणे बंधनकारक राहील.

# शुल्काचा तक्ता

| अ.क्र. | शुल्काचा प्रकार | बी.ए., बी.एस्सी.<br>प्रथम / द्वितीय / तृतीय वर्ष |
|---|---|---|
| १ | माहिती पुस्तिका | १००.०० |
| २ | नोंदणी शुल्क | ५०.०० |
| ३ | ई-सुविधा | ५०.०० |
| ४ | वैद्यकिय तपासणी | २५.०० |
| ५ | ओळखपत्र | ५०.०० |
| ६ | प्रवेश शुल्क | ५०.०० |
| ७ | नियतकालिक | १००.०० |
| ८ | स्नेहसंमेलन | १००.०० |
| ९ | विद्यार्थी व्यासपीठ | २५.०० |
| १० | विद्यार्थी मदत निधी | ५०.०० |
| ११ | महाविद्यालय परिक्षा शुल्क | १००.०० |
| १२ | महाविद्यालय विकास निधी | १००.०० |
| १३ | कल्चरल ॲक्टीव्हिटी फीस | १००.०० |
| १४ | आपतकालीन निधी | २५.०० |
| १५ | अध्ययन शुल्क | १७६०.०० |
| १६ | जिमखाना | १९४.०० |
| १७ | ग्रंथालय शुल्क | ५०.०० |
| १८ | विद्यार्थी कल्याण शुल्क | २०.०० |
| १९ | राष्ट्रीय सेवा योजना | १०.०० |
| २० | अश्वमेध | १०.०० |
| २१ | अविष्कार | १०.०० |
| २२ | इंद्रधनुष्य | १०.०० |
| २३ | आव्हान | १०.०० |
| २४ | अभियान | १०.०० |
| २५ | विद्यापीठ/महाविद्यालय निधी | ११०.०० |
| २६ | संगणक शुल्क | ५००.०० |
| २७ | पर्यावरण शुल्क | १००.०० |
| २८ | वसंतराव काळे कमवा व शिका योजना | १००.०० |
| २९ | विद्यापीठ पात्रता मराठवाडा शुल्क | ५०.०० |
| ३० | महाराष्ट्र राज्य | १००.०० |
| ३१ | महाराष्ट्र बाहेरील | ५००.०० |
| ३२ | देशा बाहेरील | १२,५००.०० |
| ३३ | प्रयोगशाळाशुल्क | ७००.०० |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर संलग्न




## डॉ.एपीजे अब्दुल कलाम कला व विज्ञान महाविद्यालय


सिल्लोड, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

संपर्क – 9970919287

website : http://drapjakascollege.in/

E-mail : drapjabdulkalamcollegesillod@gmail.com